आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

हवं असेल प्रफुल्लीत मन तर.....

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

मानवासाठी शरमेची बाबा ही आहे की तो स्वत:च प्रश्न निर्माण करणार आणि स्वत:च त्याच उत्तर ही देणार. ही तर तीच घटना आहे, एका कवीच्या शब्दात...

कौन भेजेगा मेरे खत का जवाब
खुद ही लिखा, खुद ही पढकर रख दिया ।

याचा अर्थ हा आहे की लहान मुलाने शाळेत जाण्याअगोदरच आपले मत बनवुन घ्यावे शिक्षकाने मला हे शिकविले पाहीजे, अर्थात स्वत:च निश्चित करून घेतो की 'आ' म्हणजे आंबा किंवा 'अ' म्हणजे अंजीर, तसेच व्हावयास हवे जसा मी विचार केलाय.

शाळेत गेल्यावर शिक्षकाकडे त्याच्या साऱ्या भ्रमाचे, प्रश्नांचे, मतांचे अचुक उत्तर असते. परंतु मुलांनी शिक्षकाच्या आदेशा–उपदेशांना न मानता स्वत:च्या मताच्या बंधनात अडकुन पडला तर तो जीवनात कधीच प्रगती करून शकत नाही.

याच प्रकारे मानवाने संत, महात्मा इतकेच काय तर भगवंता विषयी सुध्दा आप–आपली मते (कल्पना) निर्माण केली आहेत की, भगवंत बासरीवाला पाहीजे, किंवा धनुष्य–बाण, त्रिशुल, चक्र, गदाधारी असावयास हवा. खरे बघता ही मते बिनबुडाची आहेत, कारण ज्याने बासरी उचलेलेली आहे तो वेळ आल्यावरा चक्र, गदा, धनुष्य, त्रिशुल उचलु शकतो, कारण हे सर्व बाहय वस्तु आहेत, यांचा उपयोग गरजेनुसार केला जातो. भोजन करतांना, अंघोळ करतांना तथा झोपतांना यांचा काहीही उपयोग होत नाही याकरीता भगवंताचा या वस्तुसोबत संबध जोडणं ही एक भ्रामक कल्पना आहे.

संत महात्माविषयी मानवाची कल्पना आहे की, ते डोंगर दऱ्या तथा गुहेत राहतात, परंतु इतिहासात असे बरेच संत आहेत ज्यांनी सांसारिक कर्तव्याचे पालन करून भगवंतांची भक्ती केली जसे संत कबीरजी, संत तुकारामजी, नामदेवजी, ब्रम्हर्षी वशिष्टजी, महर्षी अत्रिजी इत्यादी. बरेच असे ही संत महत्मा होवुन गेले ज्यांना संसाराच्या बंधनात राहणे योग्य वाटले नाही.

ज्यांनी संसारात राहुन आपल्या कर्तव्य–कर्माचे पालन करून भक्ती केली तेही मुक्ती पदास पोहचले, तथा ज्यांनी संसारापासुन स्वत:स अलिप्त करून घेतले, त्यांना ही मुक्ती पदाची प्राप्ती झाली.

याद्वारे हे स्पष्ट होते की, भक्तीसाठी संसारापासुन अलिप्त राहण्याची आवश्यकता नसुन प्रत्येक शरीराच्या (मानवाच्या) आपआपल्या गरजा असतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी संसाराचे साहय घ्यावे ही लागते. संन्यासी सुध्दा भिक्षा मागण्यासाठी संसाराकडेच जातात.

सांगण्याचा भावार्थ इतकाच आहे की, आपल्याच प्रश्नाचे उत्तर स्वत: देण्याचा प्रयत्न करू नये. भगवंताविषयी प्रत्येकाच्या वेगवेगळया कल्पना असु शकतात, परंतु भगवंत त्या कल्पनांना बांधील नाही. योग्य तर हेच आहे की, परमात्माच्या सत्यरूपास जाणुन, भ्रामक कल्पनांपासुन मुक्त व्हावे.

ज्या बाबी अध्यात्मात सत्य आहेत, त्याच बाबी संसारात ही सत्यच असतात. आम्ही आमच्या सभोवतालच्या व्यक्तींविषयी आपआपली मते बनवुन घेतो, की ती व्यक्ती अशीच असेल आणि त्याच आधारावर मतभेद, द्वेष, विरोध इत्यादी नकारात्मक भावनांची आम्ही निर्मिती करीत असतो, आमच्या नकारात्मक भावनांच्या कारणे त्याच्या प्रती द्वेष तथा विरोध आम्ही निर्माण करतो, याचा परिणाम हा होतो की जराशी विपरीत परिस्थिती निर्माण झाली तर आमच्या रागाचा बांध फुटतो आणि विनाकारण आम्ही नविन शत्रु निर्माण करीत असतो.

आज सकाळी एका मित्राने एस.एम.एस. पाठविला की, ''सर्वात मोठी घोडचुक ही ठरेल की माझ्यामुळे कुणाच्या डोळयामध्ये अश्रू येणे अर्थात आम्ही कुणास दु:ख

देण्याचे कारण बनणे, त्यापेक्षा आनंदाची बाब ही आहे की कुणाच्या तरी डोळयात आमच्यासाठी अश्रू येवो अर्थात कुणीतरी आमच्याशी इतका आपलेपणा ठेवो की त्या प्रेमापोटी आणी सन्मानासाठी त्याचे अश्रू येवो.

या अवस्थेच खर स्वरूप कबीरदास जीच्या खालील दोहयात स्पष्ट होते, ज्याच्यात ते म्हणतात,

कबीरा जब तुम पैदा हुए जग हँसा हम रोए,
ऐसी करनी कर चलो, तुम हँसो जग रोए।

भावार्थ हाच की आमचे कर्म असे असावे की, जगाने आमच्यासाठी अश्रू गाळावे आणि म्हणावे – किती चांगला आहे (होता) तो.

हे होणे त्यावेळी शक्य नाही ज्यावेळी आम्ही सर्व लोकांविषयी आपल्या मनात भ्रामक आणि नकारात्मक भावनां बनवूण ठेवु, भ्रम जितके तात्काळ निर्माण होतात तितकेच झटपट त्यांचे निर्मूलन होने ही आवश्यक आहे. ज्याप्रमाणे आम्ही आपली दाढी वाढु देत नाही, दररोज दाढी बनवतो जेणेकरून आमचा चेहरा प्रफुल्लीत दिसावा, याचप्रकारे भ्रमांपासून आमची लवकरात लवकर मुक्तता व्हावी जेणेकरून आमचे मन प्रफुल्लीत/उल्हासित रहावे.

योग्य तर हेच आहे की, कुणाच्याही संबधात सकारात्मक विचार केला जावा, नकारात्मक विचारापासुन नेहमी दुर रहावे.

संत महात्मा तथा भगवंताविषयी जी सत्यता आहे त्यास जाणावे, कुणी ब्रम्हज्ञानी सद्गुरूला शरण जाऊन भ्रामक कल्पनांपासुन मुक्त होऊन सत्याशी एकरूप व्हाव. हे कर्म जितके लवकर होईल तितकेच आमचे भले होईल.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक : सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in